# प्रकरण तिसरे

## वडार समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

# प्रकरण - तिसरे

# वडार समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

## प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणामध्ये वडार समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी मांडत असताना, याठिकाणी पुढील बाबींचा ऊहापोह करणे क्रमप्राप्त ठरते. या प्रकरणामध्ये तीन विभाग करण्यात आले आहे. पहिल्या विभागात वडार समाजाचा उगम कूठून व केव्हा झाला काही अभ्यासकांच्या मते वडार समाज क्षत्रिय असून भगीरथाचे वंशज असलेल्या काही कथा यांचा आढावा घेतलेला आहे, वडारांची समकालीन वस्तीस्थाने, दुसऱ्या विभागामध्ये सामाजिक स्थितीचा आढावा घेताना त्यांच्यामध्ये असणाऱ्या उपजाती, भाषा, विवाहप्रथा, धार्मिक श्रद्धा यांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे तिसऱ्या विभागामध्ये वडार स्त्रीजीवन आणि व्यवसाय, जातपंचायत, वडार समाजाचा व्यवसाय व त्याचे स्वरूप याविषयीचे विवेचन करण्यात आले आहे.

### (I) विभाग पहिला

## अ. वडार शब्दाची उत्पत्ती :

वडार समाजाचा उगम कुठून व केव्हा झाला या संदर्भात विचार करताना आपणाला असे आढळते की, भारताच्या विविध भागात हे लोक आपल्या दैनंदिन कामात व्यस्त आहेत. प्रत्येक प्रांतात त्यांचे पारंपरिक व्यवसाय करताना आढळतात त्यांना वेगवेगळ्या प्रांतात अथवा राज्यांत वेगवेगळ्या नावाने ओळखण्यात येते. कर्नाटकात वडार सध्या भोवी म्हणून ओळखले जातात. आंध्र प्रदेशात वोड्डालु, ओडे, वाड्रू, राजलु, ओडेवांडलु, कलकोल इ. नावाने ओळखतात तसेच तामिळनाडूमध्ये ओट्टण, नायकन तर गुजरातमध्ये ओड आणि मध्य प्रदेशामध्ये ओड, ओडे, ओडिया, वडार इ. नावाने ओळखले जाते. ओरिसामध्ये ओड, ओडिया, ओड्र, उड्र, उडिया नावाने संबोधले जाते. विशेषत: उर्वरित प्रांतात यांना ओड,

ओडीया हीच नावे असलेली आढळतात परंतु प्रांतिक भेदानुसार मराठा वडार, कानडी वडार, गुजराती वडार किंवा ओड तसेच निजाम राजवटोतील वडार, सिंधी वडार, परदेशी वडार असे निरनिरळ्या राज्यांत निरनिराळी नावे पडत किंवा घडत गेलेली आढळून येतात. याखेरीज वडार लोकांना 'पाथरवट' म्हणून संबोधले जाते. पाथर म्हणजे कपडे धुण्याचा, मसाला वाटणेचा, स्नानास बसण्याचा इ.पसरट दगड होय. वट म्हणजे दगडाला आकार देणे. पाथरवट म्हणजे दगडाला आकार देणारा कारागीर होय. अशा रीतीने सर्वत्र कमी जास्त प्रमाणात वडार लोक आढळतात.

बेळगाव जिल्हा गॅजेटनुसार वड्डा हा शब्द कानडी भाषेमधील वोडड् या शब्दावरून आला आहे. याचा मूळ अर्थ बंधारा किंवा बांध घालणे असा होतो. तेलगू भाषेतही वोडड् या शब्दाचा अर्थ बांध असा आहे. पूर्वी या लोकांचा पाण्यासाठी बांध व बंधारा बांधण्यासाठी वापर होत असे. मराठी भाषेशी संपर्क आल्यानंतर वड्डाचा 'वडार' असा शब्दप्रयोग प्रचलित झाला असे तर्कसंगत वाटते. संशोधक अनंतकृष्ण अय्यर यांच्या मते ओड्डे अथवा वोड्डे हे शब्द 'ओड्र' या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे. 'ओड' हा शब्द ओरिया भाषेमधून आला आहे. 'ओड' हा त्यांचा ओडिसा शब्दाशी संबंध दर्शवितो. सामान्य जनगणना (सन १८७१) अहवालानुसार ओड्ड लोक मुळचे ओरिसा प्रांतातील आहेत. डी. गंगाप्पा (निवृत्त आय.ए.एस.अधिकारी) यांचे मते वडार मुळचे ओरिसा प्रांतातील आहेत. इ.स.पूर्व २६0 साली अशोक व कलिंग राजामध्ये घनघोर युद्ध झाले. त्या युद्धात अनेक लोक मरण पावले. त्यानंतर वडार लोक ओरिसा प्रांत सोडून देशभर पसरले असावेत. प्रा.लष्करी यांचे संशोधनानुसार वडार लोक द्रविडीयन असून त्याचा मूळ ओरिसा आहे. त्यामुळे 'ओड' अथवा वड्डा किंवा वडार हे मूळचे ओरिसा प्रांतातील असून आंध्र, तेलंगणा, महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान इ. प्रांतात अथवा राज्यात बांधकामाच्या निमित्ताने गेले आहेत. त्याकाळी बांधकामासाठी मजूर म्हणून भारतातून वडार लोकांना नेले जाई, तसेच ब्रिटिशांनीही भारतीय मजूर परदेशात नेले होते. वेगवेगळ्या प्रांताच्या भाषेच्या उच्चारातून 'ओड्र' शब्दाचे अनेक

अपभ्रंश झाले. कोण काय म्हणतो यापेक्षा पोटाचा व रोजगारीचा प्रश्न महत्त्वाचा होता, तर 'ओड्र' या शब्दाचा अर्थ देशवासीय अथवा लोकसमूह म्हणून आला आहे. महाभारतात युधिष्ठिराच्या राजसूय यज्ञकाळात त्याला उपायन (सदिच्छा भेट) देण्यासाठी ओड्र लोक समूहाने आले होते असा उल्लेख आला आहे, तसेच चिनी प्रवासी ह्यु-एन-त्संग यानेही इ.स.सातव्या शतकात ओरिसा प्रांताला भेट दिल्यानंतर येथील लोक मध्य प्रदेशाहून वेगळे, कृष्णवर्णीय व असंस्कृत लोक पाहिल्याचा उल्लेख भारतप्रवास वर्णनात केला आहे. भारतीय संस्कृती कोशानुसार प्राचीन ओडिसा प्रदेशात (प्रांतात) पूर्वी ओड्र किंवा उड्र या जमातीचे लोक राहत होते. त्यांच्या नावावरून औड्रिविषय ➔ओडिविस्स ➔ओडिविसा ➔ ओडिसा अशी रूपे होऊन या प्रदेशाला ओडिसा हे नाव रूढ झाले. सध्या या प्रदेशाला ओडिसा राज्य म्हणून संबोधले जाते. ओद्र (ओड्र) या नावाच्या जाती समूहाच्या वास्तव्यानेच त्या प्रांताला ओडिसा किंवा ओरिसा हे नाव प्राप्त झाले, असा उल्लेख शैला कामत यांनी आपल्या प्रवास वर्णनात केला आहे. यावरून वडार लोक मुख्यत: व्यवसायामुळे भारतभर विखुरलेले आढळतात. ओरिसामधील मूर्तिकला, कोणार्कचे सूर्यमंदिर, तेथील दगडातील सुंदर कोरीव कामे उल्लेखनीय आहेत. पूर्वी तेथील ओड्र समाज आपल्या कलेमध्ये किती प्रगत होता याची साक्ष मिळते. विशेषत: ओड्र ओरिसा प्रांत व आंध्र प्रदेशाच्या सीमेवर राहत होते. ओड्र लोकांचा प्राचीन वास्तव ओरिसामधील महानदीच्या उत्तर आणि दक्षिण खोऱ्याचा प्रदेश समजला जातो.

संशोधक श्रीनिवास अय्यंगर यांच्या मते आंध्रलोक हे मूळचे विंध्यपर्वतवासी आणि प्राकृतभाषीय असून उत्तरकाळात ते कृष्णा आणि गोदावरी नदीखोऱ्यांच्या प्रदेशात स्थलांतरित झाले. तेथेच ते तेलगू भाषीय बनले. ओरिसा प्रांतात ओडिया भाषा बोलत असले तरीही काही भागात तेलगू भाषा बोलली जाते, असे शैला कामत यांनी ओरिसा प्रवास वर्णनात केला आहे. त्याप्रमाणे वडार लोक ओरिसातले असले तरीही प्राचीन काळात व्यवसायामुळे स्थलांतरित झाले असावेत. त्यामुळे प्रत्येक प्रांतात अथवा राज्यात त्यांच्या मातृभाषेमध्ये भिन्नता आढळते. त्यांची कलाकारी व कष्टाळू वृत्ती पाहून त्यांना अनेक प्रांतात नेले गेले अथवा कामासाठी बोलावणी आली. तरी सुद्धा ओड्डांचे अर्थात वडारांचे उगमस्थान ओरिसाच आहे

आणि वडारांचा उगम अगदी महाभारतापूर्वीही आढळतो यात काही शंकाच नाही. इतिहास संशोधक घुर्ये यांच्या मते, इंडोआर्यन वंशातील लोकांचे आगमन इ.स.पूर्व सुमारे तीन हजार वर्षापूर्वी हिंदुस्थानात झाले. याच वंशातील लोकांनी हिंदुस्थानातील मूळ रहिवाशांना जिंकून आपले 'दास' बनविण्याचा प्रयत्न केला. येथील मूळच्या रहिवाशांना शुद्राचा दर्जा देण्याचा प्रयत्न केला. काही दास झाले, काही अपराजित राहिले, काही जंगलात, डोंगरात पळून जाऊन राहू लागले. कालांतराने मूळ रहिवाशी व इंडो-आर्यन वंशातील लोकांनी सांस्कृतिक देवाणघेवाण सुरू करणे क्रमप्राप्त ठरले. यातून अनुलोम व प्रतिलोम विवाह होऊन अनेक जातींची निर्मिती झाली असे संशोधक घुर्ये यांचे मत आहे. जातीव्यवस्थेच्या निर्मितीस वांशिक घटक जरी जबाबदार असले तरी जातीवादाची मूलभूत संकल्पना ही श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या प्रतीनुसार व्यक्तींचा दर्जा निर्धारित केला जाऊ लागल्याने व्यवसायाच्या स्वरूपानुसार अनेक जाती समुदायाचा व्यवसाय हा त्याच समुदायातील लोकांनी करावा अशा प्रकारची बंधने रूढ होऊ लागली (पवार सतिश २०१०, पृ.२,३,४,५).

## ब. भगीरथाचे वंशज असलेल्या कथा :

R.E.Ethoven यांच्या मते "The ods claim as kshatriya and state that they are descendants of Bhagirath son of sagar." हे लोक आपण क्षत्रिय असून भगीरथाचे वंशज असल्याचे सांगतात. रासमाल या ग्रंथात यांच्याविषयी पुढील कथा सांगितलेल्या आहेत.

गुजरातचा राजा सिद्धराज जयसिंग याने माळव्यातून अनेक वडार लोकांना पाटण येथील सहस्त्रलिंग तलाव खोदण्यासाठी बोलावून घेतले. त्यांच्या बरोबर त्यांच्या स्त्रिया व मुलेही होती त्यापैकी जस्मा नामक एका सुंदर तरूणीवर सिद्धराजाचे मन जडले तिला आपल्या राजवाड्यात नेण्याची इच्छा त्याने प्रदर्शित केली पण जस्माने ते मानले नाही. अब्रूच्या भयाने तिने पळत जाण्याचा प्रयत्न केला आणि त्यात अडथळे आणणाऱ्या अनेक वडार लोकांना ठार मारले, मग जस्माने आत्महत्या केली. त्यापूर्वी तिने राजाला शाप दिला की, 'तुझ्या

तलावात कधीच पाणी साठणार नाही'. आणि आपल्या लोकांना उद्देशून ती म्हणाली की, 'यापुढे वडार स्त्रिया सुंदर स्त्रिया निपजणार नाहीत.' वडार स्त्रियांनी आजपासून तेल किंवा काजळ वापरू नये असेही तिने बजावले.

**कसलो व जसलो -**

वडार जातीचे पूर्वज असणारे दोघे भाऊ-भाऊ होते. एकाचे नाव कसलो व दुसऱ्याचे नाव जसलो. दोघे मारवाड्यात राहत होते. त्यावेळी गुजरातमध्ये सिद्धराज जयसिंग राज्य करीत होते. जेव्हा हे दोघे भाऊ गुजरात प्रांतात आले त्यावेळी असणाऱ्या जसदान या राजपुत्राला दोन मुली होत्या. त्यातील एकीचे नाव जहमान होते. तिचे लग्न कसलोशी झाले त्या राजपुत्राने आपल्या राज्यात अकरा तळी खोदली. ही तळी खोदण्याचे काम जहमानच्या देखरेखीखाली चालले होते. दोन हात उंची माती वर काढण्याबद्दल जहमानला एक सोन्याची वीट मिळत होती. याप्रमाणे तिच्याकडे सोन्याच्या पुष्कळ विटा आल्या. त्या सोन्यांच्या विटाच्या उत्पन्नातून जहनानने तळ्याच्या कामावर असलेल्या मजुरांना जगविले. हेच मजूर म्हणजे वडार लोक (जमात) होय. ही जहमान पुढे सती गेली.

## क. वडारांची समकालीन वस्तीस्थाने :

वडारांच्या समकालीन वस्तीस्थांनामध्ये भारताच्या संदर्भात वडार समाज हा महाराष्ट्र, तामिळनाडू, बंगाल, ओरिसा, गुजरात, उत्तरप्रदेश, बिहार, आंध्रपद्रेश कर्नाटक (म्हैसूर), हिमाचल प्रदेश, राजस्थान, दिल्ली या बारा राज्यामध्ये आढळतो. (राठोड मोतीराज २000), त्याचप्रमाणे महाराष्ट्र व कर्नाटकामध्ये ओड्ड, वड्डा किंवा बेलदार, ओड्डे, वड्डार, वडार आणि ओर्ह या नावांनी परिचित आहे (माने लक्ष्मण १९५७, भारतीय संस्कृतीकोश खंड ८, पृ.४७४).


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## (II) विभाग दुसरा

वडार समाजाच्या सामाजिक स्थितीचा आढावा घेताना आपणाला त्यांच्यामध्ये असणाऱ्या उपजाती, भाषा विवाहप्रथा, धार्मिक श्रद्धा इ. बाबी विचारात घ्याव्या लागतात.

### अ. व्यवसायानुसार पडलेल्या उपजाती व त्यांचे व्यवसाय :

वडार जमातींचा पोटजातींचा विचार करता असे दिसून येते की, वडार समाजामध्ये व्यवसायानुसार उपजाती निर्माण झालेल्या दिसून येतात. महाराष्ट्रात गाडीवडार, मातीवडार, पाथरवट या वडार जातीच्या तीन पोटजाती प्रचलित आहेत. तसेच संचलु वडार, उचले, पाथरूट, जातीवडार, गिरणीवडार या वडार जातीच्या उपजाती मानल्या जातात. कर्नाटकामध्ये कल्लवडार, मन्नवडार, गिरणीवडार, उप्पूवडार, अरगू वडार, अरगुराज वडार, ओरू वडार, या वडारांच्या सात पोटजाती मानल्या जातात. पूर्वीच्या हैद्राबाद प्रदेशातील निजाम राजवटीच्या काळात वडारांमध्येही चिल्क किंवा कांसी, गाडी किंवा बंडी, लागोल, गोडंदल, माट्टी, सतरवरू, कुंड व उप्पार अशा आठ पोटजाती आहेत, तसेच सिंधी वडारांमध्ये राजपुताप्रमाणे भट्टी, चौहान परमार, राठोड, सोळंकी व तुंवर असे सहा पोटभेद आहेत.

व्यवसायाच्या बाबतीत विचार केला तर असे दिसून येते की, 'गाडीवडार' या पोटजातीतील लोक खाणीमधून दगड बाहेर काढणे, मागणीप्रमाणे दगड तयार करणे, त्यांच्याकडील रेड्याच्या गाडीमुळे या लोकांना गाडीवडार असे म्हणत असत. दगडी पूल, मंदिरे, कालवा, रस्ते व घरे बांधण्यासाठी रेड्याच्या गाडीतून दगडाची वाहतूक गाडीवडार करीत असत. तर 'मातीवडार' यातील लोक मातीमध्ये खोदाई करतात, त्यामुळे यांना 'मातीवडार' म्हणून संबोधले जाते. विहिरी काढणे, तलावांची खोदाई, धरणकामात, रस्ते कामात व कालव्यासाठी भराव करण्याचे काम करत असतात. मंदिरे, किल्ले, तटबंदी, राजवाडे यांसारख्या वास्तूंची पायाखोदाई करतात. त्यांच्या स्त्रिया पुरूषांच्या बरोबरीने खडी फोडण्याचे काम करतात. 'पाथरवट' या पोटजातीतील लोक खाणीतून काढलेल्या दगडास हत्याऱ्यांच्या सहाय्याने हव्या त्या प्रकाराचा आकार देतात, म्हणजेच दगडास घडाई देण्याचे काम करतात.

पाटा, वरवंटा, तुळसी कट्टा, देव-देवतांच्या मूर्ती, दगडांवरील नक्षीकाम हे लोक करतात. त्यांच्या स्त्रियांदेखील संसारोपयोगी साहित्यांना टाके घालण्याचे व घरोघरी फिरून विकण्याचे काम करतात. सद्यस्थितीत मात्र वडार समाजातील लोक वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळी कामे करताना दिसतात. ह्या दगडकामानुसार वडार समाजातही उपजाती उत्क्रांतीनुसार पडत गेल्या जशा गाडीवडार, मातीवडार, पाथरवट इ. समाजातील तीन पोटजातीपैकी गाडीवडार हे उच्चश्रेणीचे समजले जातात. कारण यांच्याकडे गाढव व डुक्करे पाळली जात नाहीत किंवा डुक्कर खाद्य म्हणूनही त्याचा उपयोग करीत नाहीत (पवार सतीश २०१०, चव्हाण रामनाथ २००३, पृ.५,१७,७४).

## ब. वडारी तेलगूमिश्रीत भाषा :

वडार समाजाची बोलीभाषा तेलगू आहे. तेलगू भाषा ही द्रविड भाषा समूहामध्ये येते. प्रादेशिक भाषेचा उगम साधारणपणे दहाव्या शतकापासून झालेला आढळतो. त्यापूर्वी द्रविड भाषा ही सार्वदेशीक भाषा होती. तेलगू भाषेमधील इ.स.सहाव्या शतकांमध्ये शिलालेख आढळतात. प्राचीन काळी वडार लोक त्यांच्या मूलस्थानावरून व्यवसायामुळे भारतभर विखुरलेले आढळतात. त्यामुळे वडार लोकांचे उगमस्थान ओरिसा असून, त्यांची बोलीभाषा तेलगू आहे असे तर्कसंगत वाटते. वडारी लोकांना वेगवेगळ्या प्रांतामध्ये वेगवेगळ्या नावाने जसे संबोधले जाते, तसे त्यांच्या भाषेलाही वेगवेगळ्या प्रांतामध्ये वेगवेगळी बोलीभाषा समजली जाते. वडार समजाची बोलीभाषा उत्तरप्रदेश, पंजाब, दिल्ली, हरियाणा, चंदिगड, हिमाचल, आसाम या ठिकाणी 'ओडकी' या नावाने परिचित आहे. तर आंध्रप्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र, तामिळनाडू, केरळ, पाँडेचरी या ठिकाणी 'वडारी' या नावाने परिचित असल्याचे दिसून येते. तसेच प्रत्येक प्रांतामधील स्थानिक भाषेचाही प्रभाव निर्दशनास येतो. त्यामुळे भारतांमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी असणारे वडार लोक स्थानपरत्वे भाषा बोलतात. वडारांची भाषा ही तेलगूमिश्रित आहे; कारण मूळ तेलगू भाषा वडारांच्या भाषेमध्ये फरक जाणवतो. वडारांच्या बोलीभाषेची स्वतंत्र लिपी नाही. वडारी भाषेमध्ये कानडी भाषेचाही समावेश झालेला दिसून

येतो. वास्तव्य जीवनामध्ये वडारी भाषेचा वापर समाजातील सुशिक्षित लोकांकडून कमी होऊ लागला आहे. वडारी भाषेमधील मूळ शब्दांचा वापर कमी होत चाललेला दिसून येतो (पवार सतीश २०१०, पृ.८९,९०,१७१)

## क. विवाहप्रथा :

विवाहाच्या पद्धतीबाबत असे दिसते की, वडार समाजांमध्ये विवाहप्रथा इतरांपेक्षा फारच वेगळी आहे. या लोकांनी आपली संस्कृती फारच जपली आहे. विवाह प्रथेमध्ये धार्मिक विधी अनेक आहेत. मातीवडार, गाडीवडार, पाथरवट अशा तीन प्रचलित उपजाती आहेत, या उपजातीतील लोकसंख्या कमी-अधिक प्रमाणात आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक उपजातीतील गोत्रसंख्या (कुलूम) कमी-अधिक प्रमाणात आढळतात. एकंदरीत तीन्ही उपजातीतील गोत्रांची (कुलूमांची) संख्या शहात्तर असल्याचे दिसून येते. एकूण गोत्रसंख्येचे दोन गट आढळतात. प्रत्येक गटामध्ये शिवगणातील अडतीस गोत्र (कुलूम) व गंगागणातील अडतीस गोत्र विभागले आहे. शिवगणातील गोत्र परस्पर भाऊबंद गोत्र समजतात त्याचप्रमाणे गंगागणातील गोत्र परस्पर भाऊबंद गोत्र समजतात. शिवगणातील गोत्रांचे गंगागणातील गोत्रांशी बेटी व्यवहार होतात असे दिसून येते. पूर्वजापासून ठरवून दिलेल्या गोत्रामध्ये लग्न करण्याची पद्धत आहे. वडार समाजामधील तिन्ही उपजातीत पूर्वी परस्पर बेटीव्यवहार होत नसत. परंतु अलीकडे काही वर्षापासून बेटीव्यवहार होऊ लागले आहेत. वडार समाजामधील प्रत्येक उपजातीत विवाह प्रथेमध्ये वेगळेपण जाणवते. आज समाज सर्वत्र विखुरला गेला आहे, तसेच पूर्वीची बालविवाह पद्धत बंद होत आहे. समाजात सुधारणा थोड्याफार प्रमाणात झालेली दिसून येते. त्यामुळे जुन्या काही रूढींना फाटा मिळत आहे.

या समाजात हुंडापद्धत नाही, मात्र विवाहप्रसंगी मुलाच्या वडिलाने मुलीच्या वडिलांना दहेज देण्याची पद्धत पूर्वीपासून चालू आहे. दहेजला 'ओली' असे म्हणतात. प्रत्येक गावातील त्या गावचे मूळ जातीप्रमुख ठरवतात. साधारण अकरा रूपयांपासून पाचशे एकावन्न रूपये इतकी असते. घोंगड्यावर वधूकडील त्या गोत्रातील मूळ वंशज (पंच) बसतात, या

पंचासमोर घेतलेले कपडे द्यायचे, एकमेकांचे देणे-घेणे उपस्थित सर्व लोकांना सांगणे. याचाच अर्थ देण्या-घेण्यातील ते लोक साक्षीदार होत, जेणेकरून लग्नावेळी देण्या-घेण्यावरून भांडणे निर्माण होणार नाही. समाजात साक्षरता कमी प्रमाणात असल्यामुळे लग्नाची यादी लिहली जात नाही, बोललेले शब्द पाळले जातात. लग्न ठरल्यानंतर सुपारी फोडून विशेषत: वधूच्या घरी (गट्टी फट्टेद) म्हणजेच साखरपुड्याचा कार्यक्रम होतो. याचप्रमाणे वडारांमध्ये गद्र देणे म्हणजे लग्नाची तारीख ठरविणे होय. नवरदेवाकडील मंडळी वधूच्या घरी येऊन गद्र देण्याचा कार्यक्रम करतात. लग्नाच्या अगोदर वधू वरास गंधाम (चंदनाला गंध-टिळा) लावला जातो.

विवाहप्रसंगी मुलाच्या वडिलाने मुलीच्या वडिलांना लग्नखर्चाच्या देऊ केलेल्या रक्कमेबरोबरच वेगळे तीन प्रकारचे कपडे द्यायचे असतात. त्यांना पोटझाकणी, आजेचीर, आणि साखरपुडा असे म्हणतात. असे कपडे लग्न प्रसंगी देणे प्रतिष्ठेचे मानले जाते. पूर्वी समाजातील विवाह लावण्याचे काम हे त्याच जातीतील किंवा कुळातील लोक करीत असत. परंतु अलीकडे गावच्या आश्रयाने राहिलेले किंवा शहरात कामाच्या निमित्ताने स्थायिक झालेले या समाजातील लोक लग्न विधीसाठी ब्राम्हण बोलावतात आणि लग्नसोहळा एक दिवसात उरकतात (पवार सतीश २०१०, पृ.५३,५४,५७ चव्हाण रामनाथ, २००३, पृ.७४)

### ड. धार्मिक श्रद्धा :

वडार समाजात धार्मिक वृत्ती फार असल्याने त्यांच्या देवदेवतादेखील अनेक आहेत. ते पूर्वजांकडून पारंपरिकरीतीने चालत आलेले आहेत. तसेच ते ज्या भागात राहतात तेथील स्थानिक देवदेवतांना तितकेच महत्त्व देतात. पूर्वजांपासून पूजा होत आलेल्या देवतांना कुलदैवत मानतात. ते कुलदैवतांना इतर देवांपेक्षा जास्त महत्त्व देतात, कुलदैवतांच्या यात्रेवेळी विशेषत: पशुबळी दिला जातो. मराठा व कानडी ओड सर्व हिंदू देवतांस भजतात त्यांची कुलदैवते व्यंकटरमण, नरसोबा, महादेव, मारूती, जनाई, सटवाई, मुरगव्वा, नागम्मा आणि यल्लाम्मा ही आहेत. त्यांचे सर्व धर्मविधी जातीतील जाणते चालवितात. यल्लाम्मादेवीची यात्रा दरवर्षी सामूहिक पद्धतीने करतात. वडार समाजामध्ये हनुमानाला दैवत शक्तीचे प्रतीक

16108

मानतात, विवाहाच्या वेळी नवरा-नवरीच्या हातातील कंकण हनुमान देवासमोर सोडविले जाते. एकूणच वडार समाजावर धार्मिक वृत्तीचा प्रचंड प्रमाणात पगडा असल्याचे दिसून येते (पवार सतीश २०१०, पृ.१०,२०,२७,२८, कालेलकर गोविंद १९८४, पृ.१२)

## (III) विभाग तिसरा

### अ. वडार स्त्रीजीवन आणि व्यवसाय :

वडार समाजातील स्त्रिया दिसायला काळ्यासावळ्या असून अतिशय काटक, दणकट अशा असतात पोशाखाचा विचार केला तर, या स्त्रिया लुगडे नेसतात त्यांचा वरचा पदर डोके व छाती यावरून घेतात, त्या चोळी घालीत नाहीत. तसेच कुंकुही लावत नाहीत. उजव्या हातात बांगड्याही घालत नाहीत, डाव्या हातात मात्र काशाच्या किंवा पितळेच्या बांगड्या घालतात. चोळी न घालण्यामागे त्यांच्यात अनेक समज प्रचलित आहेत वनवासात राहणाऱ्या सीतामाईचे आपण वंशज आहोत. असा एक समज त्यांच्यात प्रचलित आहे. तसेच चोळीपायी व दागिन्यांच्या हव्यासापायी आपल्या पतीशी वियोग होईल अशीही एक कल्पना त्यांच्यात होती. म्हणून त्यांनी चोळी व इतर दागिने यांचा त्याग केला. त्यांच्या या समजूतींना ऐतिहासिक दृष्ट्या मात्र काहीही आधार नाही. त्यांच्यातील वयस्क स्त्रिया वरील रूढीला धरून वागतात. पण सुशिक्षित मुली किंवा स्त्रिया चोळी घालतात कुंकु लावतात. व इतरही अलंकार घालतात. (भारतीय संस्कृतिकोश खंड ८ वा पृ.४७५).

वडार समाजातील स्त्रियांच्या व्यावसायिक स्थितीचा विचार केला तर पुरूषाच्या बरोबरीने स्वत:ला कामामध्ये गुंतवून घेतात. या समाजातल्या स्त्रीला केवळ चूलमूलापर्यंतच काम नाही. मूलाच्या पोटात दूध गेले पाहिजे. संध्याकाळची चूल तिच्याच कष्टावर पेटते. पोटासाठी मिळेल ते काम करण्यास ती नेहमीच तयार असते. पुरूषांपेक्षा ही स्त्री अधिक काबाडकष्ट करते. इतकेच काय नवऱ्याला दारू पिण्यास देखील चार पैसे हिलाच द्यावे लागतात. हे सर्व करून वर नवऱ्याचा मार आहेच. आपल्या घरामधील पुरूषांप्रमाणे इमारती

बांधकामावर, खाणीमध्ये काम करताना देखील आढळतात. तसेच खडी फोडण्याचे, याचबरोबर पाथरवट या पोटजातीतील स्त्रिया पाटे-वरवंटे बनविणे व वापरून जुन्या झालेल्या पाटे वरवंट्यांना टाके घालण्याचे त्याचबरोबर जाते-पाटे-वरवंटे घरोघरी जाऊन विकण्याचे काम करतात. आजच्या काळामध्ये पाटे-वरवंटा याची जागा आधुनिक उपकरणाने घेतल्यामुळे वडार समाजातील स्त्रियांचा उपजिविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

वडार समाजामधील आजच्या व्यावसायिक स्थितीचा विचार केला तर, शहराच्या संपर्कामुळे आपल्या पारंपरिक व्यवसायाबरोबर बऱ्याच स्त्रिया 'उच्चभ्रू' वस्तीमध्ये धुणी-भांडी, स्वयंपाकीण असल्याचे दिसून येते.

## ब. जातपंचायत :

जातपंचायत ही वडार समाजाची न्यायसंस्था मानली जाते. पंचायतीचे नियम अलिखित स्वरूपात असून ते काटेकोरपणे पाळले जावेत याची दक्षता घेतली जाते. परंतु अलीकडच्या काळात जातपंचायतीचे महत्त्व कमी प्रमाणात जाणवते. जातपंचायतीच्या प्रमुखास पंच म्हणतात. समाजातील प्रतिष्ठित व अनुभवी मंडळी पंच या नात्याने जातीच्या व्यवहारासंबंधी समाजातील सुव्यवस्था व नैतिकता सांभाळण्याचे काम करीत असतात. जातपंचायतीत येणारे तंटे, स्त्री-पुरूषांचे अनैतिक संबंध, व्यभिचार, लग्न कार्यातील अडचण, समाजातील अंतर्गत भांडणतंटे, नवरा-बायकोतील भांडण, मालमत्तेसंबंधीचे वाद, धार्मिक कार्या तील अडचणी, परजातीतील स्त्री-पुरूषांचे समाजातील स्त्री-पुरूषांशी असणारे अनैतिक संबंध, समाजातील व्यावसायिक भांडणतंटे अशा प्रकारची प्रकरणे जातपंचायतीमध्ये निकालात काढली जातात (पवार सतीश २०१०, पृ.७०).

## क. वडार समाजातील व्यवसायाचे स्वरूप :

दगडखाण किंवा क्रशर व्यवसाय हा दुर्मिळ ओसाड रानावर गावापासून किमान ३ ते ५ कि.मी. अंतरावर चालतो. वडार समाजातील लोक ज्या जमिनीमध्ये दगड लागेल अशा ठिकाणी खाणी लावत असतात. जमिनीतून दगड काढण्यासाठी किंवा फोडण्यासाठी लागणारे

साहित्य सुतकी, पार, टिकाव, खोरे, घण (मोठा हातोडा) इ. गोष्टी लागतात. प्रथमतः जमिनीवरील पृष्ठभागावरची माती खोऱ्याने किंवा टिकावाने काढतात. त्यानंतर जमिनीच्या वर दगडाचा किंचित भाग दिसल्यास पारीने तो वाजवून बघतात, त्या विशिष्ट आवाजावरून दगडाचा आकार, प्रकार समजतो. व्यवसायासाठी उपयोगी असल्यास पारीने तो दगड खणून किंवा खचून काढतात. माती बाजूस ओढण्यासाठी खोरे किंवा टिकाव वापरले जाते व दगड पूर्णपणे जमिनीपासून अलग केला जातो.

### १. सुतकीच्या सहाय्याने दगड फोडणे :

दगड फोडण्यासाठी 'सुतकी' नावाचे विशिष्ट हत्यार किंवा साधन वापरले जाते. ती लोखंडापासून बनवलेली असते. तिचे वजन कमीत कमी १५ किलो असते. ती एक लोखंडी आयताकृती ठोकळा असतो. दगड फोडण्यासाठी त्याच्या पुढील बाजूस ३ इंच उंचीची व २ इंच रूंदीचे चौकोनी टोकदार बोट्ट पोलादी असल्यामुळे दगड फोडला जातो. व ठोकळ्यांच्या वरील पृष्ठभागास लाकडी दांडा बनविलेला असतो. त्यांची लांबी एक फूट ते दीड फूटापर्यंत असते. तो दांडा दोन्ही हातात पकडून, हवेत उचलून, साधारणतः डोक्यापर्यंत उचलून त्या दगडावरती मारला जातो. ही प्रक्रिया पूर्ण होण्यास बराच अवधी लागतो. साधारणतः गाडीभर दगड फोडण्यासाठी कमीत कमी एक हजार वेळा हात वरखाली करून सुतकीचे ठोके दगडावर ठोकावे लागतात, त्यावेळी एक गाडी दगड निघतो. त्या दगडाच्या आकार, प्रकारावरून नंतर त्यापासून सुतकी व पहारेच्या सहाय्याने विशिष्ट दगडी माल तयार केला जातो.

### २. खाणीमधील मजूरांची कामे :

माती काढणे, मुरूम काढणे, बांधकामासाठी दगड काढणे, दगडी फरश्या काढणे, हाताने कच खडी फोडणे (बिल्डिंगच्या स्लॅपसाठी वापरली जाते) रवाळी खडी (मोठी खडी रस्त्यासाठी वापरली जाते) तसेच व्यवहारोपयोगी दगडी माल तयार करणे. उदा. घरासाठी जाते, दगडी चौकटी, पाटथर, कोपरा पाटथर, रेजगी डब्बर, दगडी पेट्या, कंडका, कोपरे, गार्ड स्टोल, हेरदए विहिर व मजबूत बांधकामासाठी फाडी, छावण्या, कुडची दुतोंडी, तळखडा,

उंबरण याशिवाय उखळ्याचे दगड, वरवंट्याचे दगड, पाट्याचे दगड, न्हाणी घरातील किंवा चौकोनातील दगडी फरश्या इ. प्रकारचा दगडी माल बनविला जातो. हा दगडी माल तयार करण्यासाठी सुतकी व पहार ही हत्यारे वापरली जातात. मालाची लांबी व रूंदी हातानेच मोजून दगड फोडून, दगडाचे कटिंग अगदी तंतोतंत एका रेषेमध्ये केले जाते. या कामामध्ये एकाग्रता व व्यवस्थितपणा असावा लागतो. चुकून जरी सुतकीचा नेम चुकला किंवा सुतकीचा वेग कमी जास्त झाला तर दगड हा वेडावाकडा फुटण्याची शक्यता असते. व हवा असलेला माल तयार होऊ शकत नाही.

जाते, पाटे, वरवंटा किंवा इतर वस्तू बनविण्यासाठी छन्नी, हातोडा, पिचर, टाकी हे साहित्य लागते, या साहित्याने दगडाला हवा तो आकार देऊन वस्तू बनविल्या जातात पिचरला आडव्या रेषेमध्ये कुऱ्हाडीप्रमाणे धार असते. एका हातामध्ये पिचर घेऊन त्याच्या डोक्यावरील बाजूस हातोड्याने हळूवार ठोके दिले जाते, यामुळे तो माल आखीव-रेखीव होतो, व घडई झाल्यानंतर माल आकर्षक दिसतो. मात्र हे काम हळूवार पद्धतीने करावे लागते. कामातून पडलेल्या कपऱ्यांच्या वापर बांधकामासाठी केला जातो.

दगड काढणारे किंवा दगड फोडणारे - टापकरी

बांधकाम करणारे - जुडई (गवंडी)

जाते, पाटे, वरवंटा बनविणारे - घडई करणारे

## ३. व्यवसायातील वैशिष्ट्ये व अडचणी :

व्यवसाय करीत असताना एकाग्रता असावी लागते.चुकून जरी सुतकी किंवा हातोड्याचा ठोका चुकला तरी केलेले काम वाया जाते. शारिरीक कष्टाचे काम असल्यामुळे सारखी तहान लागते. त्यामुळे हे लोक तोंडामध्ये ओलावा टिकून राहण्यासाठी नेहमी खाऊचे पान खातात. हे सर्व काम उन्हातान्हांत चालते. तसेच सशक्त ताकदीचे व युक्ती (कला) पारंपरिक व्यवसायातील ज्ञान या गोष्टींची जोड असावी लागते. प्रचंड शारिरीक कष्टाच्या मानाने पुरेसा पोषक आहार मिळू शकत नाही. या कामासाठी लागणाऱ्या हत्याऱ्यांना अधूनमधून

घिसाड्याकडून धार करून आणतात. पावसाळ्यांमध्ये पूर्णपणे काम बंद असते.

जमिनीतून दगड काढून त्या दगडापासून विविध काम करून घर बांधण्यापासून ते मंदिर बांधण्यापर्यंत, सडका बांधण्यापर्यंत जे काम त्यांच्या हातात होते ते सर्वच काम आज बड्या बड्या बिल्डर्सनी आणि नव्या यंत्रांनी हिसकावून घेतलेले आहे. आधुनिक उपकरणांमुळे जाते-पाटा-वरवंटा या गोष्टी हद्दपार झालेल्या दिसून येतात. पूर्वी पाथरूटाशिवाय दुसरा बांधकाम कोणीही करत नव्हता. वडाराशिवाय कोणीही दगड काढत नव्हता किंवा फोडत नव्हता. आज मोठमोठ्या खडीक्रशर आणि दगड काढणाऱ्या मशिनरी आल्यामुळे वडार समाजाचे लाखो लोक खाईत लोटले गेले आहेत. तर डोझरसारखे एक मशिन लाखो मातीवडारांचा धंदा बंद करून टाकते. डोझर या तंत्राने मातीचे काम नव्या यंत्राने घेतले याशिवाय काळाच्या ओघात दगडाऐवजी बांधकामासाठी विटांचा वापर होऊ लागलेला आहे.

**वडार समाजाची वैशिष्ट्ये :**

१. वडार लोक द्रविडीयन असून त्यांचे मूळ स्थान ओरिसा आहे. कलिंगच्या युद्धानंतर वडार लोक वेगवेगळ्या प्रांतात स्थलांतर झाले.

२. वडार जमातीचा मुख्य व्यवसाय खाणकाम, दगड आणि बांधकामास लागणारे साहित्य पुरविणे, तळे, विहिरी खोदणे, तसेच संसारोपयोगी वस्तूंची घडई करणे त्यामुळे वडार जमातीचे लोक प्रामुख्याने गाडीवडार, मातीवडार, पाथरवट इ. धंद्यावरून पोटजमातीमध्ये विभागले गेले आहेत.

३. वडार समाजामधील बोलीभाषा दक्षिण भारतात तेलगूमिश्रीत आहे. इतर ठिकाणी ओड, ओडिया असल्याचे दिसून येते.

४. वडार समाजामध्ये गोत्र (कुलूम) महत्त्वाचे मानले जाते. तिन्ही उपजातींमधील गोत्रांची (कुलूमांची) संख्या शहात्तर आहे. शिवगणातील अडतीस गोत्र व गंगागणातील अडतीस गोत्र असे गोत्रांचे दोन गट आहेत.

५. वडार समाजामध्ये जातपंचायतीला महत्त्व असल्याचे दिसून येते. परंतु आजच्या स्थितीत जातपंचायतीला पूर्वीसारखे स्थान राहिले नाही.

६. वडार समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.

७. या समाजामध्ये देवदेवतांबरोबर अंधश्रद्धेचे प्राबल्य दिसून येते.

८. वडार समाजामध्ये पूर्वी महिला चोळी व दागिने वापरत नसत. सीतामाईसारखे चोळी व दागिन्यांच्या हव्यासापायी आपल्या पतीशी वियोग होईल, असा समज आहे. पण सुशिक्षित मुली किंवा स्त्रिया चोळी व दागिने वापरतात.

अलीकडच्या काळात वडार समाजात थोडाफार बदल झाल्याचे दिसते. व्यवसायाच्या निमित्ताने गावोगाव भटकणारा समाज अलीकडे काही प्रमाणात स्थिर झालेला दिसून येतो. शहरात स्थिरावलेले लोक आपल्या पारंपरिक व्यवसायाबरोबरच इतर व्यवसाय करीत आहेत. काही लोकांनी आधुनिक व्यवसाय स्विकारलेले आहेत. परंतु त्याचे प्रमाण फार कमी असल्याचे दिसून येते. तरूण पिढीचा नवनवीन व्यवसाय करण्याकडे ओढा आहे. बदलत्या काळानुसार परिवर्तनाच्या जाणीवा प्रामुख्याने नव्या पिढीत दिसून येतात. मात्र शारिरीक कष्ट आणि वडार समाज हे समीकरण आजही कायम आहे.

या पार्श्वभूमीवर पुढील प्रकरणामध्ये चौथ्या नमुन्यात समाविष्ट असलेल्या वडार समाजामधील सदस्यांकडून मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने संकलित केलेल्या तथ्यांच्या विश्लेषणाच्या आधारे त्यांच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीचे वर्णन करण्यात आले आहे.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## संदर्भसूची : (References)


१. कालेलकर गोंविद (१९८४) -"मुंबई इलाख्यातील जाती" श्रीलक्ष्मी नारायण बुकसप्लाईंग कंपनी, मुंबई.

२. चव्हाण रामनाथ (२००३)-"भटक्या विमुक्तांचे अंतरंग", स्नेहवर्धन पब्लिकेशन, पुणे.

३. पवार सतीश (२०१०)-"वडार आणि संस्कृती", ओड्र सेवा संस्था प्रकाशन, कोल्हापूर.

४. पं. जोशी महादेवशास्त्री - "भारतीय संन्कृतीकोश खंड-८ वा", भारतीय संस्कृतीकोश मंडळ, पुणे.

५. माने लक्ष्मण (१९९७)-"विमुक्तायन-महाराष्ट्रातील विमुक्त जमाती एक चिकित्सक अभ्यास" यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.

६. R.E. Ethoven (1975)-"Tribes and castes of Bombay' cosmo publications, Delhi.

७. Rathod Mothiraj (2000)-"The Denotified and Nomadic Tribe Rights action group Newsletter."
http://sickle.bwh-harvard.edu/india-tribes-html